। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ४१ वा । गुरूवार दिनांक १६ एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### ईच्छेविरुध्द शारिरीक संबंध: गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे बेंबळी अंतर्गत पोलिसासकडून समजलेली माहिती अशी की, रा.बेंबळी ता.जि.धाराशिव येथील एका तरूणाने दि.०६.०४.२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब साखर कारखाना ते बेंबळी जाणारे रोडचे बाजुला असलेले जंगलात फिर्यादी एक महिला वय २३ वर्षे हीच्यावर तिचे ईच्छेविरुध्द शारिरीक संबंध केले वैगरे प्रथम खबरेवरुन दिनांक. १४.०४.२६ रोजी कलम ६४(१), ७९ भा.न्या.सं.अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहे.

### घरात घूसून मोबाईल व रोख रकमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे लोहारा अंतर्गत फिर्यादी -हिराचंद्र बाजीराव देवकर वय ७१ वर्षे,रा.मार्डी ता.लोहारा जि. धाराशिव यांचे फिय्रादीचे घरी मार्डी येथे अज्ञात इसमाने लाकडाच्या सहयाने फिर्यादीचे उशाजवळ ठेवलेली गेटची चावी घेवून गेटचे कुलुप उघडून घरातप्रवेश करुन दि.१४.०४.२०२६ रोजी घरात घुसून रोख रक्कम व मोबाईल असा एकुण ४०,०००किंमतीचा चोरुन नेला. अशा मजकुराच्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

पोलीस ठाणे परंडा : फिर्यादी नामे- आशाबाई विलास अंधारे वय ४७ रा.शेती रा.भांडगांव ता.परंडा जि. धाराशिव यांचे फिय्रादीचे घरी भांडगांव येथे अज्ञात इसमाने घराचे कुलुप तोडून घरात कपाटात ठेवलेले सोन्याचे चांदीचे दागिने करुन दि.१३.०४.२०२६ रोजी १९.०० ते दि.१४.०४.२६ रोजी ०९.०० वा. सु. एकुण ४०,०००किंमतीचा चोरुन नेला. अशा मजकुराच्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५ (ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


### उमरगा येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे उमरगा अंतर्गत फिर्यादी अमित मनोज तुडूंम वय २३ वय व्य शेती रा.कासारसिर्शी ता.निलंगा जि.लातुर धाराशिव यांचे इनामदार हॉस्पीटल उमरगा समोरुन मोटार सायकल ही चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी अमित मनोज तुडुंम यांनी दि.१३.०४.२०२६ रोजी दिलेल्या खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### दारफळ शिवारातून मोटारसायेकलची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्याद ज्ञानेश्वर बाबुराव सुरवसे, वय ५८ वर्षे, यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल दारफळ शिवारातील फिर्यादीचे शेतातुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-ज्ञानेश्वर सुरवसे यांनी दि.१०.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## संत गोरोबा काका समाधी सोहळ्यात नवीन पायंडा; यंदापासून दरवर्षी होणार मंदिर पायरी समाधी भजन सोहळा



**धाराशिव/तेर (रामेश्वर डोंगरे)-** वैराग्य महामेरू संत गोरोबा काका यांच्या समाधी सोहळ्यात यावर्षीपासून वारकरी फडकरी दिंडी संघटना श्री क्षेत्र तेर जिल्हाध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज तांबे आळणीकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व वारकरी फडकरी झालेल्या बैठकित नवीन उपक्रमाची सुरूवात करण्यात आली आहे. यावर्षी पहिल्यांदाच सर्व वारकरी, फडकरी आणि दिंड्यासोबत आलेल्या तमाम भाविकांच्या वतीने मंदिर पायरी भजन सोहळा आयोजित करण्यात आला. यात हजारो भाविक भक्तिरसात तल्लीन झाले होते.

बाराव्या शतकातील थोर संत व संत परीक्षक म्हणून गोरोबा काका यांची संत साहित्यात ख्याती आहे. त्यांच्या समाधी सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध भागातील दिंड्या दरवर्षी मोठ्या भक्तिभावाने तेर नगरीत येतात. त्यामुळे तेरणा नदीकाठी हा सोहळा अधिकच भक्तिमय होतो. बाराव्या शतकापासूनची ही परंपरा आजही तेवढ्याच भक्तिभावाने सुरू आहे. काकांचा अगाध महिमा चिरंतन रहावा यासाठी समस्त वारकरी, फडकरी भजन संघटना पंढरपूर अंतर्गत उपशाखा तेर यांच्या वतीने मंदिर पायरी समाधी भजन सोहळा सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत पार पडला. ही परंपरा पुढे कायम राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

यावेळी हभप विष्णू महाराज कबीर, हभप राशनकर महाराज पंढरपुरकर, हभप महादेव महाराज तांबे आळणीकर, हभप ज्ञानेश्वर तांबे महाराज आळणीकर, हभप अर्जुन महाराज लाड, हभप थोपटे महाराज देहूकर, हभप योगेश्वर महाराज इंगळे, हभप एकनाथ महाराज कापसे, तेर सरपंच फंड, तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवि कोरे आळणीकर, सुधाकर बुकन यांच्यासह फडकरी, दिंडी प्रमुख भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोदारमध्ये डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-** पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या दिमाखात व उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. शाळेचे उपप्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी यावेळी उपस्थित राहून अभिवादन केले. विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, कविता व विचार मांडले. तसेच त्यांच्या सामाजिक समतेसाठीच्या योगदानावर प्रकाश टाकण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस आणि एक प्रमुख भारतीय सण व उत्सव आहे. हा सण दरवर्षी १४ एप्रिल रोजी भारतासह जगभरात साजरा केला जातो. हा सामाजिक, सांस्कृतिक तसेच धार्मिक स्वरूपाचा सण आहे.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रम सादर करत उपस्थितांचे मन जिंकले. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित नाटिका सादर करण्यात आली. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता आठवीचे वर्गशिक्षक पांडुरंग बिराजदार सर यांनी केले. याप्रसंगी स्कूलचे उपप्राचार्य निलेश जाधव सर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले शिक्षण, समता आणि बंधुता यांचे मूल्य आजच्या पिढीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांच्या विचारांचे आचरण प्रत्येकाने आपल्या जीवनात करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे पालन करण्याची शपथ घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व प्रेरणा निर्माण झाल्याचे दिसून आले. याप्रसंगी स्कूलचे व्यवस्थापकीय अधिकारी जीवन कुलकर्णी सर, कार्यक्रमाधिकारी सुप्रिया राहिगुडे मॅडम, तसेच मोठ्या संख्येने शिक्षक, पालक, व विद्यार्थी देखील सहभागी होते.

## आजच्या युवक युवतीनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार अंगीकार करून जीवन जगावे : आय.पी.एस.डॉ.मेघना मॅडम



**जळकोट (विजय पिसे)-**विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीयतेचे चटके सहन करून अर्धपोटी उपवासी राहून शिक्षण घेतले आणि फक्त शिक्षणाच्या आणि ज्ञानाच्या जोरावर त्यांनी या देशाला भारतीय संविधान हा महान ग्रंथ दिला म्हणून तुम्ही आम्ही सर्वजन आनंदी जीवन जगत आहोत आणि त्यांनी दिलेले आदर्श विचाराचा आपल्या जीवनात अंगीकार करावा असे प्रतिपादन आय पी एस डॉ मेघना मॅडम यांनी जळकोट येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जंयत्ती दिनी व्यक्त केले . कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन आय पी एस मेघना मॅडम यांच्या हस्ते पुष्पहार दिप धूप प्रज्वलीत करून करण्यात आले यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व जंयती उत्सव समीतीच्या वतीने डॉ मेघना मॅडम याचा फेटा शाल बुके देवून ज्योती लोखंडे याच्या हस्ते सत्कार करण्यात आला संयोजन समीतीचे पदाधिकारी परमेश्वर लोखंडे अरविंद लोखंडे सागर लोखंडे विनोद लोखंडे सतिश माने याचाही सत्कार अरुण लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आला . त्यानंतर पुढे बोलताना डॉ मेघना मॅडम म्हणाल्या की खास करून माझ्या समोर बसलेल्या मुला मुलींना मी या प्रसंगी एवढच सांगते की ज्या प्रमाणे बाबासाहेबानी त्यांच्या जीवनात फक्त शिक्षणाला महत्व दिले आणि जगातील सर्वात विधवांना आणि हुशार विद्यार्थी ठरले त्याच प्रमाणे तुम्ही सुद्धा चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन आपण ही आपली प्रगती करावे असे त्या म्हणाल्या . सदरच्या कार्यक्रमात १४ तारखेच्या मध्यरात्री १० ते ११ वाजेपर्यंत महिलानी पाळाणा गित सादर केले व रात्री बारा वाजता संयोजन समीतीच्या वत्तीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले व सोमनाथ गायकवाड शिवाजी लोखंडे विठ्ठल भालेराव याच्या हस्ते निळ्या ध्वज्याचे ध्वज्यारोहन करण्यात आले व सामुदायिक त्रिशरण पंचशिल घेण्यात आले . सदर कार्यक्रमास जि .प .चे माजी सदस्य गणेश सोनटके माजी सरपंच अशोक पाटील ड आशिष सोनटक्के माजी सरपंच गजेंद्र कदम प्रकाश चव्हाण महेश कदम कृष्णात मोरे संतोष वाघमारे संजय अंगुले संजय माने विनोद गंगणे मंडळाचे प्रदिप लोखंडे स्वदेश लोखंडे लक्ष्मण लोखंडे सतिश गायकवाड मल्लीनाथ माने शितल माने बेबीसेन लोखंडे ज्ञानेश्वर लोखंडे संतोष लोखंडे युवराज लोखंडे लहू लोखंडे हरिदास लोखंडे प्रकाश लोखंडे जीवन गुळे शुभम पासोडे ओम भालेराव रोहीत माने विशाल माने सुमत लोखंडे सन्नी गायकवाड सह भिमनगर मधील बौद्ध उपासक उपासिका गावातील सामाजीक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाच्या शेवटी फटक्याची भव्य दिव्य अतिषबाजी करण्यात आली . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर लोखंडे यानी केले तर आभार अरविंद लोखंडे यांनी मानले.

## डॉ. बाबासाहेबांचे निर्णय आजही कामगार-शेतकऱ्यांचे सुरक्षाकवच



तुळजापूर (प्रतिनिधी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून आधुनिक काळातील खरे 'धर्मशास्त्र' आहे. समता, स्वातंत्र्य आणि न्यायाची मूल्ये समाजात रुजली तरच बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला भारत घडेल. विशेषतः कामगार आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही त्यांच्या हक्कांचे सुरक्षाकवच आहेत, असे प्रतिपादन प्रख्यात व्याख्याते व संशोधक प्रो. डॉ. मनोहर शिरसाट यांनी केले.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त महावितरण विभागीय कार्यालय, तुळजापूर येथे क्रेलिक प्रतिमा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शिरसाट मार्गदर्शन करत होते.

डॉ. शिरसाट म्हणाले की, १९४२ ते १९४६ या काळात कामगार मंत्री म्हणून बाबासाहेबांनी घेतलेले निर्णय आजही तितकेच महत्त्वपूर्ण आहेत. कामाचे तास १४ वरून ८ करणे, समान कामासाठी समान वेतन, महागाई भत्ता, महिलांसाठी भरपगारी प्रसूती रजा तसेच किमान वेतन कायदा ही त्यांची ऐतिहासिक देणगी आहे. आजच्या महागाई आणि बेरोजगारीच्या काळात कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांची नितांत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. मुरहरी केळे यांनी फुले-आंबेडकरी विचारांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, संविधानातील मूल्ये केवळ कागदावर न राहता ती प्रत्येकाच्या आचरणात उतरली पाहिजेत. बंधुभाव आणि सामाजिक न्याय या तत्त्वांवरच प्रगत समाजाची उभारणी होऊ शकते. महावितरणच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कार्यकारी अभियंता नंदकुमार काळे यांनी भूषवले. यावेळी अधीक्षक अभियंता संजय आडे, मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, विद्युत ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष विशाल शिंगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्वप्निल वाणी, दीपक कोथले, राहुल पवार, प्रवीण बगाडे, दिलीप अकोसकर, देवानंद सुरवसे, हंबीरे, नामदेव माळी यांसह महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महावितरण सार्वजनिक जयंती उत्सव समिती, तुळजापूर यांच्या वतीने करण्यात आले होते. प्रतिमा लोकार्पणानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात विचारांचे सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

## सोलापूर-माढा शिवसेना कार्यकारणी बरखास्त! पुढचा नंबर धाराशिवचा?

**धाराशिव (शेख अंजुम)-** सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयातून काढण्यात आलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, शाखा अध्यक्ष ते जिल्हास्तरापर्यंतची संपूर्ण कार्यकारणी बरखास्त करण्यात आल्याचा आदेश पारित झाला आहे.

या निर्णयामुळे स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. नव्याने संघटन बांधणी करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे.

या बाबत समजलेली माहिती अशी की, शिवसेना (शिंदे गट) नेतृत्वाच्या आदेशानुसार सोलापूर व माढा येथील सर्व पदाधिकारी बरखास्त करण्यात आले. शाखा स्तरापासून जिल्हा स्तरापर्यंत संपूर्ण कार्यकारणी रद्द केली आहे. नव्या कार्यकारणीच्या नियुक्तीसाठी लवकरच बैठक व मुलाखती होणार असल्याचे सांगण्यात येते.

**पुढचा नंबर कोणाचा?**

सोलापूर आणि माढा येथे झालेल्या या मोठ्या राजकीय उलथापालथीनंतर आता धाराशिव जिल्ह्यातही अशीच कारवाई होणार का? अशी चर्चा जोर धरत आहे.

धाराशिवमधील काही पदाधिकाऱ्यांनी याआधीच बरखास्ती होणार असा इशारा दिला होता. त्यामुळे आता त्यांच्या विधानाला सत्यता प्राप्त होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अचानक घेतलेल्या निर्णयामुळे अनेक कार्यकर्ते नाराज दिसून येत आहेत तर काहींनी हा निर्णय संघटन मजबूत करण्यासाठी आवश्यक असल्याचे बोलत आहेत तर काहींनी स्थानिक नेत्यांवर अन्याय असल्याचा आरोप ही होताना दिसून येत आहे.केला

## भीम गीतांनी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन, आनंद भालेराव यांच्या हस्ते प्रतिमापूजन



**धाराशिव (शेख अंजुम)-** महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, गट कार्यालय लातूर, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने कामगार कल्याण भवन, धाराशिव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीम गीतांचा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक सलोखा आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे स्मरण या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला कामगार आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाची सुरुवात स्वतंत्र मजूर जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. आनंद भालेराव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. बाळासाहेब माळी तसेच राजू सय्यद हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि कामगार चळवळीतील योगदानाचा गौरव करत त्यांच्या विचारांवर प्रकाश टाकला.यानंतर त्रिशरण गायन पार्टीच्या वतीने अर्जुन धावारे, दिलीप लांडगे, पांडू ओहाळ आणि मंगल कांबळे यांनी भीम गीतांचे प्रभावी सादरीकरण केले. त्यांच्या सुमधुर आवाजातील गीतांनी संपूर्ण सभागृह भारावून गेले. भीम गीतांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला आणि विचारांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत डॉ. आंबेडकरांविषयीचा आदर व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्र महिला सहायिका मनिषा भंडगे मॅडम यांनी केले.

या कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची नव्याने प्रेरणा निर्माण झाली असून सामाजिक एकात्मतेचा संदेशही देण्यात आला.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## युद्धाचा परिणाम:इंधनाचे दर वाढणार!

अमेरिका-ईस्त्राईल याने इराणला लक्ष्य केल्याचा परिणाम जगाला सोसावा लागत आहे तेच आता प्रत्यक्षात दिसून येत आहे. युद्ध अल्पकाळ चालेल असे वाटत असताना ते अनेक दिवस चालले, याचा परिणाम मोठा जगावर झाला. जगाला कच्चे तेल लागते ते इराण पुरवठा करीत आला आहे. जगाचे लक्ष हे इराणवर आहे. एक श्रीमंत देश असून मेहनती वर्ग आहे. इराणमध्ये इतर देशातील नागरिक अधिक कामाला आहेत. त्यामुळे मोठा बेरोजगारीचा मुद्दा आता निर्माण होणार आहे. एक तर अमेरिकेने मिसाईल हल्ले मोठ्या प्रमाणात केले आहेत. इराण रस्ते, इमारती पडल्या आहेत. शाळांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याच प्रमाणे ईस्त्राइलचे देखिल मोठी हानी झाली आहे. यात अमेरिकेला धक्का बसला नसला तरी अमेरिकेच्या जीवावर इराण भोवती जे देश आहेत यांची मोठी हानी झाली आहे. कमी क्षमतेचे मिसाईल इराणने डागले आहेत. इराण भोवतीचे राष्ट्राला मोठी हानी झाल्याने तोंड द्यावे लागत आहे. युद्ध समाप्ती बाबत पाकिस्तानात बैठक झाली तीही निष्फळ ठरली आहे. आता जगाने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्ष घालावे अशी मागणी पुढे येत आहे. अंतिम वेळी भारताने मध्यस्थ केली तरच युद्ध थांबणार आहे. त्यामुळे भारत आगामी काळात पुढकार घेईल असे चित्र दिसून येत आहे. युद्धामुळे जगाला वेढीस धरले जात आहे. पाकिस्तानाचा जगावर कोणताही प्रभाव नसताना तो मध्यस्थ होणे हस्यास्पद आहे. ती बैठक यशस्वी होईल असे वाटत असताना निष्फळ ठरली आहे. युद्ध किती नुकसानीचे ठरू शकते ते आता जगाला कळाले असेल, युद्धाचा परिणाम दिसून येणार आहे कारण आतातर कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे पेट्रोल १८ रुपये आणि डिझेल ३५ रुपये (प्रति लिटर)पर्यंत महाग होऊ शकते. विदेशी ब्रोकरेज फर्म मॅक्कायरीच्या अहवालात म्हटले आहे की, कच्चे तेल महाग असूनही देशात पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर आहेत. यामुळे कंपन्यांना नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत पश्चिम बंगालसह पाच राज्यांमधील निवडणुका संपल्यानंतर कंपन्या दर वाढवू शकतात. कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमतीमुळे कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लिटर १८ रुपये आणि डिझेलवर ३५ रुपयांचे नुकसान होत आहे. असे कंपन्यांचे म्हणणे आहे. गेल्या महिन्यात उच्चांकी पातळीवर असताना या तिन्ही कंपन्यांना दररोज सुमारे २,४०० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत होते. उत्पादन शुल्कात १० रुपयांची कपात केल्यानंतर हे नुकसान कमी होऊन १,६०० कोटी रुपयांवर आले आहे. प्रत्येक १० डॉलरच्या वाढीमुळे नुकसान प्रतिलिटर सुमारे सहा रुपयांनी वाढते, असे अहवालात म्हटले आहे. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८८ टक्के कच्चे तेल आयात करतो. यापैकी ४५ टक्के मध्य पूर्वेतून आणि ३५ टक्के रशियातून येते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती केवळ तेल कंपन्यांसाठीच नव्हे, तर देशाच्या चालू खात्यातील तुटीसाठीही धोकादायक आहेत. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत ही तूट वाढून २० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकते, असा अंदाज आहे. वाढीव दराने आता पेट्रोल व डिसेल खरेदी करावे लागणार आहे. जनतेला हा भुर्दंड बसणार आहे. एक तर युद्धाला पुर्णविराम मिळेल का नाही असा प्रश्न आहे. मिळाला तर इराण तेलाच्या किंमती वाढविणार, याला कारण म्हणजे अमेरिकेने नुकसान केले आहे त्याची भरपाई तो अधिक तेलाच्या किंमती वाढवुन निश्चित करणार यात शंका घेण्याचे कारण नाही. अमेरिकेला हे युद्ध साधे वाटत असले तरी याचा परिणाम जगाला भोगावा लागणार आहे. या युद्धामुळे रशिया व चीन आपला डाव साधण्याची शक्यता आहे. ईराणने तोडीस तोड उत्तर दिले आहे म्हणुन अमेरिका हा नरमला आहे. आता अमेरिका युद्धसमाप्तीसाठी प्रयत्न करीत असला तरी इराणच्या काही अटी ह्या अमेरिकेला मान्य होणाऱ्या नाहीत. होर्मुझ कालावा ही एक समस्या आहे. या समुद्रातून तेल किंवा गॅसवाहु जहाज घेवुन जाण्यासाठी इराणची परवानगी लागणार आहे. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात टॅक्स भरावा लागणार आहे. अशा स्थितीत होर्मुझ ही एक समस्या भारताबरोबर सर्वांची आहे. या समुद्रातून भारतीय जहाज घेवून जाण्यास परवानगी दिली जात असली तरी अमेरिकन युद्धनौकाचा पहारा असणार आहे. परिस्थिती कठिण आहे. अमेरिकेन दबाब वाढत आहे. भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नका अशी तंबी दिली होती. जगावर आपली छाप राहावी यासाठी अमेरिका मोठा प्रयत्न करीत आहे. अमेरिकेने ईराणचे जवळचे शेजारी राष्ट्र आपल्यासारखे करून घेतले आहेत. दबाब मोठा आहे. त्याच्या जोरावर इराणवर वर्चस्व मिळविण्याचा डाव आहे. मुळात आपल्या देशाला गॅसची कमतरता भासू नये असे प्रयत्न सुरु असले तरी गॅसला भारतीयांनी पर्याय शोधला पाहिजे. जो पर्यंत पर्याय शोधणार नाहीत तो पर्यंत गॅस संकट कायम असणार आहे. गॅसचे संकट कमी असेल मात्र या बाबत बाऊ मोठ्या प्रमाणात केला जात आहे. या बाबत अजूनही पारदर्शिकता दिसून येत नाही. घरगुती गॅस्चा गैरवापर व गैरप्रकार सर्रास होताना दिसून येत आहे. अगोदरच तेलाच्या किंमतीत वाढ होणार आहे. त्याच प्रमाणे गॅसच्या किंमतीत वाढ झाली तर जनतेसमोर मोठे आर्थिक संकट उभा राहणार आहे. त्यामुळे वेळीच भारतीयांनी सावध झाले पाहिजे. याला पर्याय शोधला पाहिजे. जग युद्धाच्या चिंतेत आहे. कधी युद्ध संपेल असे वाटत असले तरी केवळ चर्चेच्या फेरी होताना दिसून येत आहेत. सुदैवाने युद्ध समाप्त झाले तरी यातून सावरण्यासाठी वेळ लागणार आहे. याची किंमत जगाला मोजावी लागणार आहे. जसे भारतात आत इंधनाचे दर वाढणार आहेत तसेच गॅसचे दर वाढण्याची शक्यता आहे. सर्व काही जगात व्यवस्थित चालू असताना अचानक युद्धाचा परिणाम भोगावा लागणार आहे. याला जबाबदार अमेरिका असणार हे जगाला कळले आहे. त्यामुळे भारताने अगोदरच स्वदेशी उत्पादनावर भर देवून त्याचाच वापरावर भर दिला आहे. परावलंबीपना घातक आहे हे आता सर्वांना कळाले आहे. त्यामुळे भारतीय बनावटीचा अधिक वापर होणे अपेक्षित असून गॅसला पर्याय शोधला पाहिजे. सौरऊजार्चा वापर कसा अधिक करता येईल तो आगामी काळात करावा लागेल.

# सौर ऊर्जेतून कृषिपंपाना वीज देण्यात महावितरणची कामगिरी दिशादर्शक

## मध्यप्रदेश वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून कौतुकोद्गार



**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महावितरणची कामगिरी इतर राज्यांसाठी दिशादर्शक आहे. राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी सुरु असलेल्या या योजनांची माहिती घेतल्यानंतर मध्यप्रदेशच्या पथकाकडून हे गौरवोद्गार काढण्यात आले.

मध्यप्रदेशच्या पथकाने अभ्यास दौऱ्यात बुधवारी (१५ एप्रिल) महावितरणचे मुख्यालय प्रकाशगड येथे सौर ऊर्जेतून कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती घेतली. संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंते ज्ञानेश कुलकर्णी, पंकज तगलपल्लेवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी सादरीकरणाच्या माध्मातून योजनांची सविस्तर माहिती दिली. मध्यप्रदेशच्या पथकात मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक गुरुदीप सिंग कनुजा, सहाय्यक महाव्यवस्थापक धिरज कुमार मुनिया, अधीक्षक अभियंता चिंतामणी ठाकर, व्यवस्थापक शंकर नारायण अग्रवाल, विनोद राऊत यांचा समावेश होता.

जगातील सर्वांत मोठा १६ हजार मेगावॅट विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत ३ हजार १८७ कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १२ लाख ८२ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा ४ हजार ७७९ मेगावॅट विजेचा पुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे.याशिवाय मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनेसह विविध योजनांमधून राज्यात ९ लाख १७ हजार ५८७ कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. देशभरात बसवण्यात आलेल्या एकूण ऑफ ग्रीड सौर कृषिपंपांपैकी ६४ टक्के कृषिपंप एकट्या महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्यातील ३२ लाख ७६ हजार म्हणजेच एकूण कृषिपंपांपैकी ७३ टक्के कृषिपंपांना सध्या दिवसा वीज पुरवठा सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# ममदापूर येथे १७ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**लातूर/प्रतिनिधी :** महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता मौजे ममदापूर येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिर मंगल कार्यालय, ममदापूर पाटी या ठिकाणी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या शिबिरला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

या समाधान शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारले जाणार असून त्या माध्यमातून शेतकरी व नागरिकांना विविध सेवा व सुविधा एकाच ठिकाणी पुरविल्या जातील. यामध्ये प्रामुख्याने पंचायत समितीमार्फत घरकुल, जनावरांसाठी गोठा व विहीर योजनांची माहिती दिली जाईल. कृषी विभागाद्वारे अ‍ॅग्रीस्टॅक, फार्मर आयडी, पी.एम. विकास योजना, बी-बियाणे व खतांबाबत मार्गदर्शन केले जाईल. भूमी अभिलेख विभागामार्फत क पत्रक, नकाशे व जमीन मोजणी अर्जांचे वाटप होईल, तर आरोग्य विभागाकडून नागरिकांची आरोग्य तपासणी करून आयुष्यमान कार्डांचे वितरण केले जाईल.

याव्यतिरिक्त महिला व बाल विकास विभागामार्फत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची माहिती दिली जाईल. विद्युत वितरण विभाग नवीन रोहित्र कनेक्शन व शेती वीज पुरवठ्याबाबत मार्गदर्शन करेल. तहसील कार्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी रहिवासी, उत्पन्न, जात व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रे यासारखे विविध दाखले दिले जातील. तसेच संजय गांधी निराधार योजना, नवीन रेशन कार्ड वाटप, रेशन कार्ड दुरुस्ती आणि जिवंत सातबारा वाटप यांसारख्या महत्त्वाच्या सेवाही येथे उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार श्री. तांदळे यांनी केले आहे.

# लातूरच्या रंगभूमीचा तेजस्वी दीप मालवला नाट्यवेड्या कल्याण वाघमारे यांचे दुःखद निधन





**लातूर/प्रतिनिधी :**लातूरच्या सांस्कृतिक विश्वावर शोककळा पसरवणारी अत्यंत वेदनादायी बातमी समोर आली आहे. नाट्य क्षेत्रात आपल्या अभिनय, दिग्दर्शन आणि सर्जनशीलतेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण करणारे रंगकर्मी कल्याण वाघमारे यांचे दि. १४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२:२० वाजता संभाजीनगर (औरंगाबाद) येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. ते अवघे ४८ वर्षांचे होते.

कल्याण वाघमारे हे केवळ एक कलाकार नव्हते, तर ते नाटकावर जीवापाड प्रेम करणारे खरे ''नाट्यवेडे'' होते. त्यांच्या जाण्याने लातूरच्या रंगभूमीतील एक महत्त्वाचा स्तंभ कोसळला आहे.

**नाटकासाठी जगलेले आयुष्य**

कॉलेज जीवनापासूनच कल्याण यांना नाटकाची विलक्षण ओढ होती. वर्गात बसण्यापेक्षा ते तालमीत रमायचे. युवक महोत्सव असो किंवा सांस्कृतिक स्पर्धा भारुड, एकपात्री, एकांकिका, दीर्घांक अशा सर्व प्रकारांमध्ये त्यांनी आपली छाप पाडली. नाटक म्हणजे त्यांच्यासाठी केवळ कला नव्हती, तर तो त्यांचा श्वास होता.

तरुण वयातच ''नाट्यवेडा'' म्हणून मिळवलेली ओळख त्यांनी आयुष्यभर जपली. अत्यंत साधेपणाने आणि नम्रतेने त्यांनी वरिष्ठ रंगकर्मींचे मन जिंकले. श्रीराम गोजामुंडे, बाळकृष्ण धायगुडे यांसारख्या ज्येष्ठ कलाकारांनी त्यांच्याकडे एक नाविन्यपूर्ण दिग्दर्शक म्हणून आपुलकीने पाहिले.

**आजाराशी झुंज आणि जिद्द**

जीवनाच्या एका टप्प्यावर त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या. मात्र नाटकावरील प्रेम आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी आजारालाही हरवण्याचा प्रयत्न केला. लातूरमधील अनेक डॉक्टरांनी आणि नाट्यप्रेमींनी त्यांच्यासाठी पुढाकार घेतला.

संभाजीनगर येथे त्यांच्या मोठ्या बहिणीने स्वतःची किडनी देत त्यांना नवजीवन दिले. वर्षभरापूर्वी झालेली ही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी ठरली होती. या क्षणाचा आनंद संपूर्ण लातूरने साजरा केला होता.

आविष्कार गोजमगुंडे यांच्या पुढाकारातून लातूरच्या नाट्यप्रेमींनी नाट्य प्रयोग करून त्यांच्या उपचारासाठी निधी उभारला, अनेकांनी आर्थिक मदत केली हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर असलेल्या प्रेमाचे प्रतीक होते.

**रंगभूमीवरील अविस्मरणीय योगदान**

कल्याण वाघमारे यांनी दिग्दर्शक म्हणून अनेक दर्जेदार नाटके साकारली तु वेडा कुंभार, खेळीमेळी, तू यावं, साखरेचे पाच दाणे, अर्धा कोयता, नटसम्राट, रिझर्वे शनवाले, पुन्हा मोहेंजोदारो, बेबी, टेडी बेअर, भोवरा, जात, जान तेरे नाम तर अभिनयातूनही त्यांनी ठसा उमटवला

गोची शाकुंतल, ती, मै वारी जावाँ, येवडा, सामना नाटकातील प्रत्येक अंग अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाशयोजना यावर त्यांची पकड होती.

विशेष म्हणजे ''टेडी बेअर'' या नाटकात त्यांच्या मुलीने साकारलेली भूमिका आणि तिला मिळालेले पारितोषिक हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला.

आजाराशी झुंज देताना देखील त्यांच्या मनात नाटकच होते. संभाजीनगरला जाताना त्यांनी सोबत असणाऱ्या अविष्कार गोजमगुंडे यांना एकच वाक्य सांगितले

''मी असो किंवा नसो, लातूरचे नाटक पुढे गेले पाहिजे'' हा शब्द त्यांच्या नाट्यप्रेमाचा जिवंत पुरावा आहे.

१५ एप्रिल रोजी लातूरच्या मारवाडी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अनेक मान्यवर, रंगकर्मी आणि नाट्यप्रेमींनी उपस्थित राहून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुली आणि त्यांना नवजीवन देणारी बहीण असा परिवार आहे. कल्याण वाघमारे यांचे जाणे म्हणजे लातूरच्या रंगभूमीवरील एक प्रकाशझोतच हरपणे होय. त्यांच्या कार्याची उणीव कधीही भरून निघणार नाही.

रंगदेवतेचा हा नाट्यवेडा कलाकार आज पडद्याआड गेला पण त्याने पेटवलेला नाट्यप्रेमाचा दिवा कायम प्रज्वलित राहील.

# लोह आणि 'व्हिटॅमिन डी'च्या कमतरतेची लक्षणे कोणती?

आपण अन्न फक्त पोट भरण्यासाठी घेत नाही तर शरीराला योग्य पोषक तत्वे मिळावी म्हणून घेतो. कारण जेव्हा शरीराला पुरेशा प्रमाणात पोषक तत्वे मिळतात तेव्हाच आरोग्यविषयक समस्या उद्भवत नाहीत. परिणामी आपण निरोगी राहतो. निरोगी राहण्यासाठी आणि योग्य पोषक तत्वे मिळवण्यासाठी आपण योग्य पदार्थ खाणं महत्त्वाचं आहे. परंतु, जागरूकतेच्या अभावामुळे काही लोक पोषक तत्वे घेत नाहीत आणि जरी ते घेतली तरी ते योग्यरित्या शोषले जात नाहीत. अशा परिस्थितीत, शरीरात जीवनसत्त्वांची कमतरता आपोआप निर्माण होते. जीवनसत्वांची कमतरता झाल्यास शरीर काही संकेत देतो. निरोगी जीवन जगण्यासाठी लोह, व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन सी आणि बी१२ महत्त्वाची भूमिका बजावते. जीवनसत्त्वांच्या कमतरतेवर मात कशी करावी आणि शरीरात पोषण तत्वांची कमतरता झाल्यास काय होते ते जाणून घेऊया.

मॅग्नेशियमची कमतरता असेल तर: मॅग्नेशियम हे शरीरासाठी एक आवश्यक पोषक घटक आहे. शरीराच्या कार्यासाठी ते एक महत्त्वाचे पोषक तत्व आहे. जेव्हा शरीरात मॅग्नेशियमची कमतरता होते, तेव्हा थकवा, भूक न लागणे, स्नायू दुखणे, हृदयाच्या समस्या आणि मूड स्विंग्स यासारख्या समस्या उद्भवतात. म्हणून, अशा लक्षणांकडे कधीही दुर्लक्ष करू नका. मॅग्नेशियमच्या कम तरतेची लक्षण जाणवल्यास त्वरीत डॉक्टरांशी संपर्क साधा.

लोहाची कमतरता: शरीरात लोहाची कमतरता झाल्यास केस गळती, श्वास घेण्यास त्रास आणि सामान्य थकवा जाणवतो. तसंच जर शरीरात पुरेसे लोह नसेल तर रक्तवाहिन्यांमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो. यामुळे भविष्यात गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. या लक्षणांकडे कधीही दुर्लक्ष करू नका.

कॅल्शियमची कमतरता: नखांसाठी आणि हाडांच्या आरोग्यासाठी कॅल्शियम खूप महत्वाचे आहे. जेव्हा आपल्या शरीरात कॅल्शियम कमी होते तेव्हा हाडांच्या समस्या, ठिसूळ नखे, हात सुन्न होणे यासारखी लक्षणे उद्भवतात.

ओमेगा ३ ची कमतरता: ओमेगा ३ हे शरीराला आवश्यक असलेले निरोगी चरबी आहे. शरीरात ओमेगा ३ ची कमतरता भासल्यास कोरडी त्वचा, मानसिक आजार आणि सांधे कडक होणे यासारख्या समस्या उद्भवतात. तसंच त्वचा खडबडीत होते. केस आणि नखे देखील ठिसूळ होऊन तुटू लागतात. याव्यतिरिक्त, थकवा, निद्रानाश आणि एकाग्रता कमी होणे यासारखी लक्षणे दिसू लागतात. व्हिटॅमिन सीची कमतरता: व्हिटॅमिन सी आपल्या शरीरासाठी तसंच त्वचेच्या आरोग्यासाठी खूप चांगले आहे. जर शरीरात व्हिटॅमिन सीची कमतरता झाली तर, त्वचा निस्तेज आणि कोरडी होते. हिरड्यांमधून रक्त येतो त्यासोबतच जखमा लवकर बऱ्या होत नाहीत. या समस्या जाणवल्यास त्वरीच डॉक्टरांशी संपर्क साधा.

झिंकची कमतरता: झिंक हे देखील आपल्या शरीरासाठी एक आवश्यक पोषक तत्व आहे. ते आपल्या शरीरात कमी झाले तर भूक कमी होते. मुरुमांसारख्या समस्या उद्भवतात. यासोबतच जखमा झाल्यास त्या लवकर बऱ्या होत नाहीत. वास आणि चव घेण्यास त्रास होतो. कधीकधी ही लक्षणे तीव्र सर्दी झाल्यावर देखील दिसून येतात.

---------------------

# मधुमेही रुग्णांना डोळ्याद्वारे देखील समजू शकतात 'हाय ब्लड शुगर'ची लक्षणे

नेक लोकांना मधुमेह होतो. एकदा मधुमेह झाला की, तो नियंत्रणात ठेवणे हाच एकमेव उपाय आहे. म्हणूनच मधुमेही रुग्ण काहीही खाण्यापूर्वी दोनदा विचार करतात. आपल्या सर्वांना माहित आहे की, मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेची पातळी वाढल्याने वारंवार लघवी आणि पचन यासारख्या अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. मात्र, तज्ञ म्हणतात की, जर या लोकांमध्ये रक्तातील साखरेची पातळी वाढली तर ते त्यांच्या डोळ्यांवरूनही ओळखता येऊ शकते. शरीरात रक्तातील साखरेची पातळी जास्त असताना कोणती लक्षणे दिसतात हे तुम्हाला माहिती आहे का?

**रक्तवाहिन्या खराब:** शरीरात रक्तातील साखरेची पातळी वाढली की डोळ्याच्या रेटिनातील रक्तवाहिन्या खराब होतात. तज्ञांचं म्हणणं आहे की, यामुळे डोळ्यांना सूज येते. डोळ्यातून द्रव देखील बाहेर पडू लागतो, ज्यामुळे दृष्टी अंधुक होते आणि वस्तू ओळखण्यास त्रास होतो. ही लक्षणे एका डोळ्यात किंवा दोन्ही डोळ्यांत दिसू शकतात. जर ही स्थिती दीर्घकाळ राहिली तर डोळ्याच्या लहान रक्तवाहिन्यांचे नुकसान होण्याचा आणि दृष्टी कमी होण्याचा धोका असतो. याव्यतिरिक्त, मधुमेहाच्या रुग्णांना मोतीबिंदू होण्याची शक्यता जास्त असते. त्यांना काचबिंदू देखील होऊ शकतो, जो ऑप्टिक नर्व्हला झालेल्या नुकसानीमुळे होतो.

संशोधन काय म्हणते? (द जर्नल ऑफ द अमेरिकन मेडिकल असोसिएशन) नेत्ररोगशास्त्रात प्रकाशित झालेल्या २०१७ च्या अहवालानुसार, संशोधकांना असं आढळून आलं की, उच्च रक्तातील साखरेची पातळी असलेल्या मधुमेही रुग्णांना डोळ्याना सूज येणे आणि पाणी येणे यासारखी लक्षणे जाणवत होती.

तुमच्या रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी, या चरणांचे अनुसरण करा

ज्यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त आहे त्यांनी पालेभाज्या जास्त खाव्यात, विशेषत: पालक, ज्यामध्ये मॅग्नेशियम आणि फायबर भरपूर असते.

मधुमेहींनी तळलेले अन्न खाण्याऐवजी उकडलेले अन्न खावं. कारण तळलेल्या अन्नाचे पौष्टिक मूल्य कमी होते आणि त्याच्या कॅलरीज वाढतात. यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.

व्हिटॅमिन सी समृद्ध असलेली संत्री, बेरी आणि सफरचंद खा. तुम्ही पेरू देखील खाऊ शकता.

मधुमेहींनी कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले धान्य खाणे चांगले. ग्लायसेमिक इंडेक्स हे अन्न रक्तातील साखरेची पातळी किती लवकर वाढवते हे मोजते. म्हणूनच, तज्ञ शिफारस करतात की मधुमेह असलेल्या लोकांनी त्यांच्या आहारात तपकिरी तांदूळ, ओट्स, क्विनोआ आणि लाल मसूर यांसारखे पदार्थ समाविष्ट करावेत.

मद्यपान आणि धूम्रपान यासारख्या सवयी टाळा.

मधुमेहींनी काय टाळावे?

मधुमेहींनी मीठाचे सेवन कमी करावे.

मांसाहारी पदार्थ, दुग्धजन्य पदार्थ, आईस्क्रीम, नारळ तेल आणि चिकनमध्ये चरबीचे प्रमाण जास्त असते.

जर तुम्हाला मधुमेह असेल तर तुम्ही फास्ट फूड आणि तळलेले पदार्थ टाळावेत.

मधुमेहींनी त्यांच्या आहारात फायबरयुक्त फळे, भाज्या आणि धान्ये यांचा समावेश करावा. म्हणून, नाश्त्यात उपमा, बोंडा, वडा आणि पुरी टाळा.

त्याऐवजी, तुम्ही नाश्त्यात ओट्स आणि डाळ खावीत. दुपारच्या जेवणात हंगामी फळे खावीत. दुपारी भात कमी आणि पालेभाज्या जास्त खाव्यात.

कधीकधी, बीटचाही आहारात समावेश करावा. दिवसातून किमान एकदा तरी डाळीचा आहारात समावेश करावा.

# जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क

## लसीकरण मोहिमेला वेग–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५-१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकाराला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

**जपानी मेंदूज्वराची वैशिष्ट्ये आणि धोका**

महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात.

**राज्यातील सद्यस्थिती**

राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.

**लसीकरण मोहिमेची प्रगती**

एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान लसीकरण मोहिमेत राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. पहिल्या डोसचे एकूण कव्हरेज ८९.२६ टक्के तर दुसऱ्या डोसचे ७८.६८ टक्के आहे. धाराशिव (९९.५९ टक्के), लातूर (९७.८४ टक्के) आणि सोलापूर (९५ टक्के पेक्षा जास्त) जिल्ह्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मात्र रायगड ५५ टक्के पहिला डोस व ४८ टक्के दुसरा डोस, पुणे आणि पीसीएमसी भागात दुसऱ्या डोसचे प्रमाण तुलनेने कमी



असल्याचे दिसून आले आहे.

**निदान व उपचार सुविधा**

राज्यात जपानी मेंदूज्वराच्या निदानासाठी नागपूर, गडचिरोली, सेवाग्राम (वर्धा), भंडारा आणि गोंदिया येथे पाच सेंटीनेल केंद्रे कार्यरत आहेत. तसेच १६ जिल्ह्यांमध्ये बाल अतिदक्षता विभाग सुरू असून रुग्णांना आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

**विदर्भ भाग सर्वाधिक संवेदनशील**

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार विदर्भ हा जपानी मेंदूज्वरासाठी सर्वाधिक संवेदनशील भाग आहे. ग्रामीण व कृषी क्षेत्रात डासांची वाढ, तसेच डुक्कर व पक्ष्यांच्या संपर्कामुळे संसर्गाचा धोका अधिक असतो. काही शहरी व उपनगरी भागातही साथीचा धोका संभवतो.

**नियंत्रणासाठी व्यापक उपाययोजना**

राज्यात नियमित लसीकरण, विशेष मोहिमा, रक्त नमुना तपासणी, डास नियंत्रणासाठी धूरफवारणी, क्यूलेक्स डासांचे सर्वेक्षण, जनजागृती, डासांच्या उत्पत्तीस्थळांवर गप्पी मासे सोडणे तसेच स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत.

**जनतेला आवाहन**

जपानी मेंदूज्वर हा आजार विशेषतः लहान मुलांसाठी धोकादायक असल्याने नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे, डासांपासून संरक्षण करावे आणि ताप किंवा मेंदूशी संबंधित लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत १४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीत राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मुल्ये, सामाजिक न्याय, समता व बंधुता या विषयी जागरुकता निर्माण करणे हा आहे. स्पर्धेत सहभागी हूण्यासाठी https://forms.gle/RcFPhcUgY8X4P2NT8 या लिंकवर निबंध अपलोड करावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी औताडे पी. जे. आणि कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी गिरीश महामुनी यांनी केले आहे.

गट – १ साठी आयटीआय, डिप्लोमा, बायफोकल, एसीव्हीसी विद्यार्थ्यांसाठी शब्दमर्यादा ५०० ते ८०० शब्द असणार आहे. गट –२ साठी पुरुष, महिलांसाठी खुला गट शब्दमर्यादा ८०० ते १२०० शब्द असणार आहे. या दोन्ही गटांसाठी १४ ते २० एप्रिल, २०२६ या कालावधीमध्ये निबंध सादरीकरण निबंध पीडीएफ (हस्तलिखीत किंवा टंकलेखित) स्वरुपात सोबत दिलेल्या लिंकवर अपलोड करणे आवश्यक आहे.

दोन्ही गटातील प्रथम पारितोषिक ३१ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक २१ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक ११ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र अशा स्वरुपाचे राहील. निबंध मराठी भाषेतच लिहिणे अनिवार्य आहे. मूळ (ओरिजनल) निबंध असावा. निबंधाची कॉपी आढळल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा व मजकूर शिष्ट आणि सुसंस्कृत असावा. निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरुपात स्वीकारला जाईल. मात्र अंतिम सादरीकरण पीडीएफ स्वरुपातच करणे आवश्यक आहे. निबंध टंकलिखित (टाईप) करुन करुन किंवा हस्तलिखित निबंध स्कॅन करुन https://forms.gle/RcFPhcUgY8X4P2NT8 या लिंकवर अपलोड करावा.

स्पर्धकांनी पूर्ण नाव, गट क्रमांक, संपर्क क्रमांक शाळा, महाविद्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता आदी माहिती भरणे आवश्यक आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी सर्व सहभागी स्पर्धकांना डिजिटल प्रमाणपत्र दिले जाईल. या स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी ९१५२२३०१९३ या व्हॉट्सअप क्रमांवर संपर्क करावा.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे पुरोगामी विचारांचे दीपस्तंभ – प्राचार्य श्रीधर कोल्हे



**लातूर/प्रतिनिधी :**येथील जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निमित्ताने ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ वाचन, विचार प्रबोधन व व्याख्यानमाला अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कोल्हे यांनी डॉ. आंबेडकरांचे पुरोगामी विचार आजच्या भारतासाठी दीपस्तंभ प्रमाणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. देशाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक विकासात त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही कायम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अंगीकार करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. डॉ. हरिश्चंद्र चौधरी यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करत, त्यांनी पुढील अनेक पिढ्यांचा विचार करून भारतीय राज्यघटना तयार केली असल्याचे सांगितले. जागतिक स्तरावर अस्थिरतेचे वातावरण असतानाही भारतात टिकून असलेल्या शांततेचे श्रेय राज्यघटनेला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच संविधानिक मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकप्रशासन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. शरण निलंगेकर यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूल्यांवर आधारित प्रशासनाची संकल्पना डॉ. आंबेडकरांनी देशाला दिली असल्याचे सांगितले. प्रशासन तटस्थ राहून तळागाळातील घटकांना न्याय मिळावा यासाठी राज्यघटनेत करण्यात आलेल्या तरतुदींचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी प्रशासनातील पारदर्शकता व जबाबदारीची जाणीव ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अविनाश पवार यांनी आर्थिक समानतेच्या सिद्धांतावर भाष्य करताना, योग्य आर्थिक वितरणाच्या अभावामुळे समाजात विषमता वाढत असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक विचार आजच्या काळातही तितकेच मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण यांनी ऐतिहासिक संदर्भांच्या आधारे सामाजिक विषमतेवर प्रकाश टाकत, गौतम बुद्ध व डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या समता, स्वातंत्र्य व न्यायाच्या विचारांची आजही गरज असल्याचे प्रतिपादन केले. समाजात बंधुता व मानवतेचे मूल्य रुजविण्यासाठी या विचारांचा प्रसार आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर आधारित मनोगते व्यक्त केली तसेच वाचन प्रेरणा अभियानालाही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रंथ प्रदर्शनामध्ये संविधान, सामाजिक सुधारणा व अर्थशास्त्र विषयक विविध पुस्तके मांडण्यात आली होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना ग्रंथालय विभागामार्फत करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. रिता कदम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. संजीवनी मराठे, श्री. रामदास जाधव तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## मुसळेवाडी येथील ५० व्या अखंड हरिनाम सप्ताहास भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांची उपस्थिती

**लातूर/प्रतिनिधी :** गेल्या पन्नास वर्षापासून सुरू असलेल्या रेणापूर तालुक्यातील मौजे मुसळेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि भागवत कथा ज्ञानयज्ञात भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड मंगळवारी सहभागी झाले. यावेळी श्री ज्योतिर्लिंग देवस्थानच्या सभामंडपाचे लोकार्पण करण्यात आले. भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या या सप्ताहात महिला पुरुषांची मोठी गर्दी होती. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने आ. कराड यांचे स्वागत करण्यात आले.



प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मौजे मुसळेवाडी येथे गेल्या ८ एप्रिल पासून अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व पानगाव येथील ह.भ.प. प्रभाकर गिरी महाराज यांचा भागवत कथा ज्ञानयज्ञ सुरू आहे. या भागवत कथेच्या समारोप प्रसंगी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड आवर्जून उपस्थित होते. यावेळी भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, संगायो समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, ॲड. दशरथ सरवदे, सुकेश भंडारे, ज्ञानोबा भिसे, श्रीकृष्ण जाधव, शिवाजी जाधव यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना आ. कराड म्हणाले की, आध्यात्मिक, सांप्रदाय क्षेत्र संपतो की काय असे वाटत असताना गावोगावी होत असलेल्या सप्ताहाला असलेली उपस्थिती पाहून मोठे समाधान मिळत आहे. मात्र कुठल्याही धार्मिक कार्यक्रमास ८० टक्के महिलांचा सहभाग दिसून येत असल्याचे सांगून माझा जन्म वारकरी कुटुंबात झाल्याने अध्यात्माचे संस्कार माझ्यावर आहेत. आपण सर्वांनी दिलेल्या आशीर्वादामुळे मतदार संघातील ३५० विविध मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे भाग्य मला मिळाले. हा सांप्रदाय, आध्यात्मिक क्षेत्र टिकला पाहिजे यासाठी ५५० भजनी मंडळांना साहित्याचे वाटप केले. मुसळेवाडी गावच्या विविध विकास कामासाठी यापुढील काळात अधिकची मदत केली जाईल सर्व शेत रस्त्याचे मजबुतीकरण केले जाणार आहे. मुसळेवाडीचा सप्ताह अखंडपणे शंभर वर्षे यशस्वी पूर्ण करेल असे बोलून दाखविले.

प्रारंभी कथाकार ह.भ.प. प्रभाकर गिरी महाराज आणि गेल्या पन्नास वर्षांपूर्वी अखंड हरिनाम सप्ताह उभा करणारे ह.भ.प. दगडूबा महाराज डोके जोडवाडीकर यांचा आ. रमेशअप्पा कराड यानी यथोचित सत्कार केला. तर मुसळेवाडी ग्रामपंचायतीसह भजनी मंडळ, शेतकरी गट व इतर अनेकांनी आ. रमेशअप्पा कराड यांचा सत्कार करून स्वागत केले. यावेळी भूषण संपत्ते, गोविंदराव देशमुख, श्रीमंत नागरगोजे, मारुती गालफडे, नाथराव गीते, दिगंबर येडले, मुसळेवाडीचे सरपंच सुधीर कुंटेवाड, उपसरपंच बिभीशन जाधव, नारायण जाधव, बलभीम जाधव, आबासाहेब जाधव, ज्ञानेश्वर जाधव, अनिरुद्ध जाधव, बालाजी कुंटेवाड, अनुरथ महाराज, श्रीमंत जाधव, बालासाहेब जाधव यांच्यासह मुसळेवाडी येथील ग्रामस्थ महिला पुरुष भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पथारी व्यावसायिकांना मिळणार ‘क्यूआर कोड’ ! एका क्लिकवर उपलब्ध होणार सर्व माहिती

**पुणे/प्रतिनिधी :** शहरातील सर्व पथारी व्यावसायिकांची पोलीस पडताळणी करून त्यांची सखोल तपासणी करण्यात येणार आहे. पात्र व्यावसायिकांना बारकोड, क्यूआर कोड आधारित ओळखपत्र देण्यात येणार असून, त्याद्वारे त्यांना अधिकृत परवाना (लायसन्स) मिळणार आहे. शहरातील पथारी व्यावसायिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महापौर मंजूषा नागपुरे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

शहरातील पथारी व्यावसायिकांना शिस्तबद्ध व कायदेशीर चौकटीत आणण्यासाठी हे निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये सुसूत्रता येणार आहे. पथारी व्यावसायिकांना क्यूआर कोड असलेले ओळखपत्र दिले जाणार असल्याने त्यामध्ये संबंधित व्यावसायिकाची संपूर्ण माहिती उपलब्ध असणार आहे.

व्यवसायाचा प्रकार, परवानगीची जागा यांची माहिती यामध्ये असणार आहे. यामुळे शहरातील बेकायदा पथारी व्यावसायिकांवर नियंत्रण ठेवणे सोपे होणार आहे. तसेच, यामुळे अधिकृत व्यावसायिकांना संरक्षण मिळणार आहे. बेकायदा पथारी व्यावसायिकांची माहिती समोर येणार असल्याने शहरातील वाहतूक व सार्वजनिक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या आदर्शांप्रती आपली कटिबद्धता मोठ्या उत्साहाने पुनरुच्चारली

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने भारतरत्न बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांची १३५ वी जयंती, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ऊळच्) कार्यालयाच्या आवारात मोठ्या उत्साहाने आणि आदराने साजरी केली.

कार्यक्रमाची सुरुवात सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ऊळच्) आणि अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या हस्ते डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. याप्रसंगी या दूरदृष्टी असलेल्या नेत्याला, भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते असलेल्या महामानवाला विनम्र अभिवादन करण्यात आले. आदर आणि श्रद्धेचे प्रतीक म्हणून सामूहिक 'बुद्ध वंदना' सादर करण्यात आली.

या जयंती सोहळ्याचा एक भाग म्हणून, कर्मचाऱ्यांमध्ये या महान समाजसुधारकाच्या जीवन आणि आदर्शांविषयी जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने, दिनांक ०९.०४.२०२६ रोजी डॉ. बी.आर. आंबेडकर: भारतातील सामाजिक न्यायाचे शिल्पकार या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ऊळच्) यांच्या हस्ते करण्यात आला; त्यांनी विजेत्यांना रोख बक्षिसे आणि प्रशस्तिपत्रे देऊन सन्मानित केले.

उपस्थितांना संबोधित करताना, सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी राष्ट्रनिर्मिती आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या दिशेने बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले प्रेरणादायी विचार, मूल्ये आणि असाधारण योगदान अधोरेखित केले.




त्यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना डॉ. आंबेडकरांची तत्त्वे आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले.

कर्मचारी विभागाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला विविध शाखांचे अधिकारी, तसेच मान्यताप्राप्त कामगार संघटना आणि मंडळे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते; त्यांनीही याप्रसंगी आपले विचार मांडले आणि डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या विचारांना व क्रुतींना विनम्र अभिवादन केले. यावेळी कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला, ज्यामुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला. या सोहळ्याद्वारे सोलापूर विभागाने बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतून प्रेरित झालेल्या सर्वसमावेशकता, सलोखा आणि सामाजिक प्रगती या आदर्शांप्रती आपली कटिबद्धता पुन्हा एकदा दृढ केली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा डॉक्टरांना महत्वाचा संदेश

**नागपूर/प्रतिनिधी :** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू बुधवारी (१५ एप्रिल) नागपुरातील अखिल भारतीय आयुविज्ञान संस्थेच्या (एम्स) द्वितीय दीक्षांत समारंभात प्रमुख पाहूण्या म्हणून उपस्थित होत्या. येथे उपस्थितांना उद्बोधन करतांना त्यांनी प्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दीक्षाभूमीबाबत महत्वाचे विधान केले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, नागपूरच्या या पवित्र भूमीवर आपणा सर्वांच्या उपस्थितीत येऊन मला मनापासून आनंद होत आहे. कालच आपण देशवासीयांनी भारताचे संविधान शिल्पकार डॉ. भीमराव आंबेडकर यांची जयंती साजरी केली. आज त्यांच्या दीक्षाभूमी येथे असलेल्या नागपूरच्या या भूमीवरून मी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करते. राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थान असलेल्या एम्स नागपूर येथे आयोजित या दीक्षांत समारंभात पदवी व पदके प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करते. आज पदवी आणि पदके मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना मी विशेष शुभेच्छा देते. या यशामागे योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक, संरक्षक आणि शिक्षक यांचेही मी मनापासून कौतुक करते. आपण ज्या परिश्रमाने, निष्ठेने आणि चिकाटीने आपले शिक्षण पूर्ण केले आहे, ते अत्यंत प्रशंसनीय आहे. आपण सर्वजण आयुष्याच्या एका नव्या प्रवासाला प्रारंभ करत आहात. आज पदवी स्वीकारताना आपण मानवजीवन आणि समाजाच्या कल्याणाशी निगडित एक महत्त्वाची जबाबदारीही स्वीकारत आहात, असेही राष्ट्रपती म्हणाल्या.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## स्त्री रुग्णालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रुग्णांना फळे वाटप



धाराशिव (प्रतिनिधी)-येथील स्त्री रुग्णालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत रुग्णांना फळे वाटप करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करत त्यांच्या समता, बंधुता व न्यायाच्या तत्वांचे स्मरण केले.

या प्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजा भूषण पुरस्कार प्राप्त शंकर खूने,राष्ट्रवादी काँग्रेस (SP) चे उमेश सिरसाठे (सर), एम. आर. शेख तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत हे प्रमुख उपस्थित होते.

तसेच मानवी हक्क अभियान संघटनेचे तालुकाध्यक्ष जनार्दन वाळवे, मानवाधिकारचे तालुकाध्यक्ष दादा मुळे, सुनील वाघमारे, निलेश ओव्हाळ, कैलास कांबळे, सागर सिरसाठे, प्रेम वाघमारे, सुनील वाघमारे, मारुती राऊत यांच्यासह रुग्णालयातील परिचारिका व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. रुग्णांच्या आरोग्याची विचारपूस करून त्यांना धीर देण्यात आला. या उपक्रमातून समाजाप्रती कर्तव्यभावना आणि मानवतेचा संदेश देण्यात आला.

उपस्थितांनी आपल्या मनोगतातून बाबासाहेबांचे विचार आजही तितकेच मार्गदर्शक असून समाजाने शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तत्वांचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## शिलाई मशीन, पितळाची बकेट व घागर, वेल्डींग मशिन, स्कु मशीन, व रोख रक्कमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुलतान जावेद सय्यद, वय ३३ वर्षे, रा. शकील शेख याची घरी किरायाने फकीरा नगर नुरमस्जिद जवळ धाराशिव ता.जि. धाराशिव यांचे राहते घराचे मागील बाजूच्या भिंतीच्या विटा पाडुन अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश करुनघरातील एक शिलाई मशीन, एक पितळाची बकेट, एक पिताळाची घागर, एक वेल्डींग मशिन, स्कु मशीन, व रोख रक्कम ७००० असे एकुण ११,३०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी सुलताना सय्यद यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती धाराशिव शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध उपक्रमांनी साजरी



धाराशिव (शेख अंजुम)- : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय, धाराशिव येथे विविध उपक्रमांनी समृद्ध असा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान होते. प्रमुख उपस्थितांमध्ये जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर, वैद्यकीय अधिक्षक डॉ. तानाजी लाकाळ, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. उज्वला गवळी, उपअधिष्ठाता डॉ. एस. ए. मुंडेवाडी, तसेच डॉ. सचिन देशमुख, डॉ. भास्कर साबळे आणि अधिसेविका श्रीमती सुमित्रा गोरे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन व फ्लेक्सचे अनावरण करून करण्यात आली. यानंतर प्रा. देवदत्त (एम.एस्सी. फिजिक्स, बी.एड.) यांनी प्रमुख व्याख्यान देत आंबेडकरांच्या विचारांची सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उपयुक्तता अधोरेखित केली. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच समाजसेवेची जाणीव जोपासावी, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात संविधान प्रस्तावनेचे सामूहिक वाचन तसेच विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आलेले पथनाट्य विशेष ठरले. पथनाट्याद्वारे संविधानातील मूल्ये प्रभावीपणे मांडत सामाजिक जागृतीचा संदेश देण्यात आला. या सादरीकरणास उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी अब्दुल लतीफा (सोशल वर्कर व मेंबर), डॉ नलावडे सर, डॉ महेश पाटील, श्री रवी सुरवसे (प्राचार्य), श्री शाम माळी, श्रीमती शुभदा तांबे,श्रीमती शेळकीकर तसेच मान्यवरांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सिद्धार्थ जानराव, श्री अंकिज सवाई, श्री विठ्ठल कांबळे, श्री नवनाथ सरवदे , श्री महादेव शिनगारे तसेच श्री गणेश चव्हाण श्री आनंद, श्री अमृत कुंभार,जयंती समिती सदस्यांनी आणि स्मार्ट कर्मचारी विशेष परिश्रम घेतले.

## धाराशिवमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) पक्षाच्यावतीने डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

धाराशिव (प्रतिनिधी)- भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरात विविध ठिकाणी अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहरातील प्रमुख चौक, स्मारके तसेच सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवर राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील,जेष्ठ नेते जीवनराव गोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महामानवांच्या विचारांचा वारसा जपत समता, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांना अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला. समाजात समानतेची भावना रुजवण्यासाठी तसेच संविधानिक मूल्यांचे पालन करण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात नगरसेवक तथा गटनेते खलिफा कुरेशी, नगरसेवक अयाज (बबलू) शेख, नगरसेवक पंकज भोसले, नगरसेवक सुनील आंबेकर, नगरसेवक सर्फराज कुरेशी, नगरसेवक इस्माईल शेख, युवक जिल्हाध्यक्ष श्री शेखर घोडके, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अविनाश तांबारे, श्री जयंतराव देशमुख, श्री नरसिंह मेटकरी, अ‍ॅड. योगेश सोने पाटील,अ‍ॅड. अविनाश जाधव, श्री रवी ठेंगल, श्री सुरज वडवले, श्री सचिन अंधारे, श्री शुभम सुकाळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## बाबासाहेबांची जयंती म्हणजे ज्ञानाचा उत्सव - बसवराज पाटील

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाला थाटात प्रारंभ...



मुरूम (डॉ. रामलिंग पुराणे ), बाबासाहेबांची जयंती म्हणजे ज्ञानाचा उत्सव असून बाबासाहेबांनी संपूर्ण जगाला ज्ञान दिला असे प्रतिपादन माजी मंत्री तथा भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित जयंती उत्सवास प्रतिवर्षाप्रमाणे दि. १३ रोजीच्या मध्यरात्री तथागत महात्मा गौतम बुद्ध,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णांकर्ती पुतळ्याला पुष्प व पुष्पहार अर्पण करून, साठे चौक, महात्मा बसवेश्वर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौका पर्यंत कॅन्डल मार्च काढून जय भीमच्या घोषणा देत थाटात प्रारंभ झाला. दि. १४ एप्रिल रोजी भीम नगर येथील डॉ. आंबेडकर शहर वाचनालयाच्या प्रांगणात मंडळाच्या वतीने आयोजित जयंती उत्सवाच्या अनुषंगाने बसवराज पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजरोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साखर आयुक्तालंय माजी संचलाक डी. आय. गायकवाड, प्रमुख अतिथी म्हणून मुरूम नगरीचे नगराध्यक्ष बापुराव पाटील, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते उमरगा लोहारा समिती सहअध्यक्ष शरण पाटील,उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरूळे,रशीद शेख व्यंकटराव जाधव गुरुजी, नगरसेवक गणेश अंबर, गौस शेख, रुपचंद गायकवाड,माजी सरपंच योगेश राठोड,सौ. महादेवी बनसोडे, सौ. रागिणी गायकवाड आदी सह नगरसेवक, मुरूम शहरातील प्रतिष्टीत नागरिकांची उपस्थिती होती. पुढे बोलताना पाटील म्हणाले परंपरागत आपण अनके सण साजरे करतोत त्यापैकी एक आनंदाचा सण म्हणजे बाबासाहेबांची जयंती, प्रत्येक क्षेत्रात त्यांचा योगदान राहिला आहे, त्याकाळातील समाज रचना त्या काळातील सर्व गोष्टीचा जर विचार केला तर आपल्या देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला बाबासाहेबांच्या रूपाने एक मोठी देणगी आपल्याला मिळाली.आपल्याला चांगले जीवन जगण्याची संधी मिळाली आणि त्यासाठी प्रामुख्याने बाबासाहेबांचे नाव घ्यावं लागेल कारण अनेक कष्टाला सामोरे जातं त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करुन तथागत महात्मा गौतम बुद्ध,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकर्ती पुतळ्यास पुष्प व पुष्पहार अर्पण करून धम्मचारी धम्मभूषण यांनी त्रिशरण पंचशील पार्थना घेतली. यावेळी शरण पाटील यांनी मनोगतपर बोलताना जयंती उत्सवा निमित्त शुभेच्छा दिल्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना गायकवाड म्हणाले

बाबासाहेबांचा जीवन म्हणजेच एक प्रेरणा आहे, त्यांना फक्त दलित समाजातच जकडून ठेवू नका, सर्व धर्मियांच्या लोककल्याणकारी कार्ये बाबासाहेबांनी केली त्यांचा कार्य प्रत्येक समाजात पोहचवण्यासाठी अनुयायीनी प्रयत्न करावा, नाचून नाही तर वाचून बाबासाहेबांची जयंती उत्सव साजरी करण्याचे अवहान त्यांनी यावेळी केले.याप्रसंगी राहुल लेझिम पथकांनी लेझिम खेळाचे सादरीकरून करून मानवंदना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सिद्धार्थ मुरूमकर, प्रस्ताविक मंडळाचे अध्यक्ष मदनलाल गायकवाड तर आभार प्रा. महेश कांबळे यांनी मानले. मंडळाचे उपाध्यक्ष अमोल बनसोडे, कोषाध्यक्ष प्रा. अण्णाराव कांबळे, सचिव आनंद गायकवाड, सहसचिव शाम गायकवाड आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.यावेळी बौद्ध उपासक, उपासिका, भीम अनुयायी, मुरूम शहरातील विविध सामाजिक संघटना, प्रतिष्टीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डी आय गायकवाड यांच्या वतीने सुरुची भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. असंख्य नागरिकांनी भोजनाचा लाभ घेतला. पंधरा दिवस संपन्न होणाऱ्या उत्सवात विविध सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमाचा समावेश असून कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

१५/०४/२०२६ - बुधवार सकाळी ११ वाजता निबंध स्पर्धा लहान गट - वर्ग १ ते ५ विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र, मोठा गट - वर्ग ६ ते १२विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशहिताबाबत केलेले कार्य. संयोजक : दिनेश भालेराव, सिद्धार्थ कांबळे, अभिषेक कांबळे सायंकाळी ७ वाजता वकृत्व स्पर्धा

लहान गट : १ ते ५ विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र, मोठ गट : ६ ते १२ विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री स्वातंत्र्याबाबत केलेले कार्य संयोजक : राहुल गायकवाड सर, प्रबुद्ध गायकवाड, कपिल कांबळे, १६/०४/२०२६ - गुरुवार, १७/०४/२०२६ - शुक्रवार लहान मुलांच्या विविध स्पर्धा संयोजक : निखील गायकवाड, सिद्धार्थ कांबळे, प्रजीत कांबळे, राष्ट्रजीत कांबळे, अजिंक्य गायकवाड, १८/०४/२०२६ - शनिवार सायंकाळी ७ वाजता. संगीत रजनी - मंजुषा शिंदे सौजन्य : १. स्मृतीशेष अर्जुन मसाजी कांबळे यांच्या स्मरणार्थ व २. आयु. पार्वती विठ्ठलराव गायकवाड, १९/०४/२०२६ - रविवार सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परिक्षा संयोजक : प्रविण रुपचंद गायकवाड, प्रशांत कल्याणी गायकवाड, अभिजीत राम कांबळे, प्रबुद्ध नंदकुमार गायकवाड, राहुल गायकवाड प्रथम पारितोषक - ५०००, द्वितीय पारितोषक ३०००, तृतीय पारितोषक २००० विजयी स्पर्धकांना स्पर्धा परिक्षेची प्रत्येकी ५ पुस्तके भेट देण्यात येतील. सौजन्य : बाबासाहेब सुखलाल गायकवाड स्थळ : प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरुम नावनोंदणी साठी संपर्क : ७२६४०५००६०, सायंकाळी ७ वाजता - डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांचा समजाप्रती असलेला हृदयस्पर्शी भावविश्व उलगडून दाखवणारा एकपात्री भावसंवाद. मी रमाई बोलतेय! - संवादिका प्रा. नेहा गायकवाड (पुणे) सौजन्य : अमोल कल्याणी बनसोडे (उपाध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती मंडळ भिमनगर, मुरुम) २०/०४/२०२६ - सोमवार विठ्ठल कांगणे सायंकाळी ७ वाजता युवकांना स्पर्धा परिक्षेविषयी मार्गदर्शन व व्याख्यान आयु. कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, लातूर सौजन्य : आयु. शिवाजी मसाजी कांबळे आयु. गुलाब मसाजी कांबळे,आयु. सत्तेश्वर शिवाप्पा गायकवाड, २१/०४/२०२६ - मंगळवार अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रम माधव बावगे सर, लातुर वेळ सायंकाळी ७ वाजता,२२/०४/२०२६ - बुधवार सकाळी ११ वाजता रांगोळी स्पर्धा, संयोजक : मनिषा महेश कांबळे, रेश्मा नानाराव कांबळे सायंकाळी ६ वाजता होम मिनीस्टर खेळ पैठणीचा फेम सादरकर्ते दुर्गाप्रसाद मोटे. २३/०४/२०२६ - गुरुवार, २४/०४/२०२६ - शुक्रवार नृत्य स्पर्धा / सांस्कृतीक कार्यक्रम व बक्षीस वितरण संयोजक - अजिंक्य गायकवाड, सुंदर गायकवाड, महेश भालेराव, राहुल गायकवाड, २५/०४/२०२६ - शनिवार स्नेहभोजन सौजन्य - आयु विद्यासागर कांबळे वेळ १२ ते ५ वा स्थळ : बौद्ध कट्टा २६/०४/२०२६ - रविवार तथागत गौतमबुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांची भव्य मिरवणुक २८/०४/२०२६ - मंगळवार अधिकारी / कर्मचारी यांचा सत्कार समारंभ. भिमनगर मुरूम चा प्रगती आलेख व पुस्तीका प्रकाशन वेळ : सायंकाळी ७ वाजता. २९/०४/२०२६ - बुधवार सायंकाळी ७ वाजता संगीत रजनी कडुबाई खरात सौजन्य : आयु. मा. राजकुमार सागर साहेब,सौ. वंदाराणी राजकुमार सागर

पंधरा दिवस संपन्न होणाऱ्या उत्सवात बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून शहर व परिसरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649